# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी २२६१७९६९ फॅक्स – २२६९०००७

E-mail: desk18@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


**संकेतस्थळ - परिपत्रक**

का.क्र.१८/तंशिसं/संस्था-पत्र/२०१७/२०१
दिनांक:- ०६/११/२०१७.

प्रति,
सर्व प्राचार्य / संचालक /अधिष्ठाता
पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी व तत्सम संस्था

**विषय :- केंद्र शासनाच्या सन २०१७-१८ मधील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी असलेली गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती (मेरीट-कम-मिन्स ) योजनेअंतर्गत National Scholarship Portal वर विद्यार्थ्यांकडून भरण्यात आलेल्या अर्जांची तपासणी (Scrutiny) करण्याबाबत...**

संदर्भ :-
१. या कार्यालयाची सूचना क्र.18/DTE/MCM-Advt/2017/101 dtd. 18/07/2017
२. या कार्यालयाची सूचना क्र. No.18/DTE/MCM-Advt./2017/112 dtd. 28/07/2017 (Revised Schedule of Fresh / Renewal Scholarship-2017-18)
३. या कार्यालयाची सूचना क्र.No.18/DTE /MCM-Advt./2017/141 dtd. 28/08/2017 (Second Revised Schedule -2017-18)
४. या कार्यालयाची सूचना क्र.No.18/DTE /MCM-Advt./2017/145 dtd. 04/09/2017 (Third Revised Schedule -2017-18)
५. मिनिस्टरी ऑफ मायनॉरिटी अफेअर्स, नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त सुचना.
६. या कार्यालयाचे परीपत्रक क्र.१८/तंशिसं/संस्था-पत्र/२०१७/१५६,दि. १९/०९/२०१७.
७. मिनिस्टरी ऑफ मायनॉरिटी अफेअर्स, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.९/२१/२०१७-एसएस,दि.०२/११/२०१७.

उपरोक्त विषयांच्या केंद्रशासनाच्या संदर्भ क्र.७ च्या पत्रानुसार सर्व संबंधित संस्थाना कळविण्यात येते की, सन २०१७-१८ करीता **गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती** (Merit–Cum-Means) योजनेसाठी विद्यार्थ्यांनी केंद्र शासनाच्या National Scholarship Portal (संकेतस्थळ : www.scholarships.gov.in) वर ऑनलाईन भरलेल्या अर्जांची, संस्थेने उपरोक्त योजनेसाठी असलेल्या त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्डव्दारे केंद्र शासनाने दिलेली मुदत **दि.१५/११/२०१७ पर्यंत** ऑनलाईन तपासणी करुन (अर्जामध्ये विद्यार्थ्यांनी भरलेल्या माहितीची खात्री करुन) ऑनलाईन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावेत व अर्जासह संबंधित कागदपत्रांच्या प्रती संस्थांनी कुठेही जमा न करता आपल्याकडे जतन करुन ठेवाव्यात. जर संस्थेने कोणताही अपात्र विद्यार्थ्याचा अर्ज ऑनलाईन नामंजूर केला तर अर्ज नामंजूर करण्याचे सुस्पष्ट कारण संबंधित रकान्यात नमूद करण्यात यावे जेणेकरुन विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगीन आयडीव्दारे अर्ज नामंजूरीचे कारण समजू शकते. **संस्थेने कोणताही अर्ज त्यांच्या लॉगीन आयडीमध्ये तपासणीसाठी शिल्लक राहू देऊ नये.**

तसेच संबंधित संस्थांना अशाही सूचना करण्यात येत आहेत की, केंद्र शासनाने दिलेल्या मुदतीमध्ये विद्यार्थ्यांनी भरलेले ऑनलाईन अर्ज संस्थेच्या लॉगीन आयडीमध्ये तपासणी करुन पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याचे राहिले तर असे अर्ज सिस्टीमव्दारे रिजेक्ट/नामंजूर (संस्थेने ऑनलाईन तपासणी न केल्यामुळे) करण्यात येतील आणि याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील. तरी यासाठी संस्थाप्रमुखांनी याबाबत स्वतः लक्ष द्यावे, जेणेकरुन विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही.

( डॉ. सुभाष महाजन )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

\\192.168.1.9\Desk18\Minority cell\Shaskiya patra\From 2017-18\MCM\Letter to Institute.docx